# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, विरार
## ता. वसई, जि. पालघर

जा.क्रं. ववशिम/सा.प्र/ ५० /२०१८
दिनांक : ०१/०८/२०१८

### जाहिर दरपत्रक

याव्दारे सर्व पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, महानगरपालिकेस १५ ऑगस्ट २०१८ रोजीच्या कार्यक्रमासाठी खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे साहित्य खरेदी करावयाचे असून त्याकरिता दिनांक १० /०८/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता बंद पाकिटातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यांत येत आहेत.

| अ.क्रं. | साहित्याचा तपशिल | अंदाजीत संख्या |
|---|---|---|
| १. | पारले कंपनीचे मेलोडी चॉकलेट १०० चॉकलेटचे १ पॅकेट पुरविणे | २३८६ पॅकेट |
| २. | पारले बिस्कीट (५ बिस्कीटांचे छोटे पॅकेट) ३६ पॅकेटचा १ बॉक्स प्रमाणे | २९ बॉक्स |
| ३. | खादी ग्रामउद्योग निर्मित राष्ट्रीय ध्वज १८०० mm x १२०० mm | ३ नग |
| ४. | खादी ग्रामउद्योग निर्मित राष्ट्रीय ध्वज १३५० mm x ९०० mm | १२ नग |
| ५. | पोस्टकार्ड साईज निमंत्रण पत्रिका कव्हरसहित छपाई (प्रति शेकडा दर) | अंदाजीत खरेदी ५०० नग |

### अटी व शर्ती

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दर पत्रकारवर वस्तू व सेवाकर नोंदणी क्रमांक (GST) असणे बंधनकारक राहिल.

२) मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे.

३) दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहिल.

४) दरपत्रकास मंजूरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून करारनामा करुन ३ दिवसांत साहित्याचा पुरवठा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

५) दरपत्रकात नमुद वस्तुंचे/साहित्यांचे दर हे सादर करताना मुळ किंमत, वस्तू व सेवाकर (GST),वाहतुक खर्च व इतर कर वेगवेगळे दर्शविण्यात यावेत.

६) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा. उपायुक्त यांना राहिल.

७) वरिल अटींचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.

८) यासंबंधीची दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दिनांक १० /०८/२०१८ रोजी दु. ३.०० वाजता मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक १० /०८/२०१८ रोजी दु. ४.०० वाजता उपायुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार
दिनांक : १/८/२०१८

उपायुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका